VOL- X ISSUE- III MARCH 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# लोकमान्य टिळकांचे राष्ट्रसभा व शिक्षणविषयक विचार

**डॉ. चंद्रशेखर शंकरराव ढोले**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय नळेगाव

प्रस्तुत शोधनिबंध लो. टिळकांचे राष्ट्रसभा व शिक्षण विषयक विचार या शोधनिबंधाची मांडणी लोकमान्य टिळकांचे राष्ट्रसभा व शिक्षणासंबंधी विचार यासंदर्भात करण्यात आली आहे लोकमान्य टिळक भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील व जहालवादी चळवळीचे नेते होते 1885 मध्ये राष्ट्रसभा म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना पारतंत्र्यातील भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी करण्यात आली होती स्थापनेनंतर या संघटनेत फूट पडली ती दोन गटात विभागली ती ती विचाराच्या आधारावर त्यापैकी एक गट मावळ वाद्यांचा तर दुसरा गट जहाल वाद्यांचा होता लोकमान्य टिळक हे जहाल विचार वादी होते कारण भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांना विधायक मार्गावर विश्वास नव्हता त्यामुळेच त्यांनी हा मार्ग स्वीकारला होता लोकमान्य टिळकांचे शिक्षण विषयक विचार अतिशय महत्त्वाचे व विशेष आहेत त्यांनी शिक्षक म्हणून शिक्षण क्षेत्रासाठी योगदान दिले आहे त्यावेळी शिक्षण हा विषय अति महत्त्वाचा होता इंग्रज सरकारने शिक्षण क्षेत्रात जी विषमता निर्माण केली होती त्यावर टिळकांनी टीका केली होती त्यातून भारतीयांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी राष्ट्रीय शिक्षण ही संकल्पना स्वीकारली व भारतीय समोर मांडली होती. पारतंत्र्य भारताच्या जनजागृतीसाठी व सांस्कृतिक जनप्रबोधनासाठी चांगल्या उच्च शिक्षणाचे समर्थन केले होते नीती व धर्म या शिक्षणासह राष्ट्रप्रेम निर्माण करणारे शिक्षण त्यांना अपेक्षित होते. राष्ट्रीय पद्धतीने राष्ट्रीय शिक्षणावर भर देऊन टिळकांनी राष्ट्रधर्मावर आधारित शिक्षणावर विश्वास दाखवला.

लो. टिळकांनी आपल्या आयुष्यातील आरंभीची वीस वर्षे या परतंत्र भूमीतील लोकशक्ती जागी करण्यात घालविली. शेतकरी, कामकरी, साळी, कोष्टी अशा कष्टकऱ्यांच्यात स्वत्त्व आणण्याचे, शक्ती जागृत करण्याचे भरपूर प्रयत्न केले. लोकशक्ती जागृत झाली, तिला संघटित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. राष्ट्रीय कांग्रेसही बाळसे धरू लागली ती टिळकांच्या संघटनकौशल्यामुळे काँग्रेसमध्ये सर्व जातींची, पन्थ्यांची माणसे एकत्र आली. राष्ट्रचा अभ्युदय हे एकच ध्येय ठेवल्याने मतभेद झाले तरी टिळकांनी सावधपणाने मतभेद दूर केले. त्यांच्या मते संघशक्ती निर्माण करण्यास मतभेद नष्ट केले पाहिजेत असे नाही. सर्व मतभेद एककार्यवाही करण्याचा प्रयत्न करणे हा आहे. दोन मते असले तरी दोन्ही माताचे लोक एकाच राष्ट्रकार्यधुरेचे वाहक आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रत्येकाने आपली मते लोकांपुढे मांडावीत. एकमेकांच्या सहकार्यातच सर्व शक्ती आहे व राष्ट्राच्या प्रगतीचेच ध्येय डोळ्यापुढे आहे हे सर्वांनी समजून घ्यावे असे टिळक मानत. स्वतः टिळकांनी आयुष्यभर राष्ट्रसभेची संघशक्ती अभंग राखण्याचाच प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी अनेकवेळा अपमानही सहन केला. सुरत काँग्रेसमधील फूट दूर केली. 'काँग्रेस अभंग राहात असेल तर या सर्व अपयशाचे खापर मी माझ्या माथी घेण्यास तयार आहे' असे सांगून टिळकांनी काँग्रेससारख्या राष्ट्रीय संघटनेला वाचविण्याचा प्रयत्न केला. कांग्रेस हे मोठे बळ आहे, शक्ती आहे हे जाणून त्यांनी ती वाढावी असाच प्रयत्न केला. काँग्रेसची शक्ती ती आपली शक्ती हे त्यांना माहिती होते. त्यामुळे सर्व मर्यादा पाळून संघटना बलवती ठेवण्यावरच त्यांनी भर दिला. कारण संघटनेचे महत्त्व ते जाणत होते. अनेक वेळा अनेक ठराव त्यांना मान्य नसत, पण संघटनेला भेग पडण्याच्या भयाने ते ठराव मान्य करीत. संघटनेविषयीची निष्ठाच काँग्रेसला बळ मिळवून देऊ शकली. त्यामुळे सर्व प्रांत, पक्ष, धर्म, वर्ग यांचे ऐक्य आणण्यात ते यशस्वी ठरले. त्यासाठी कमालीचे कष्ट त्यांनी उपसले. आपल्या कठोर मेहनतीच्या प्रयत्नातून त्यांनी हिंदू बरोबरच मुसलमानात, पारशी, ख्रिश्चन यांनाही संघटनेत आणले. तेथे कोणी गरीब

नव्हता, कोणी श्रीमंत नव्हता. भाषाभेदही विरून गेले होते. टिळकांच्या या संघटनकौशल्यामुळे थोरापासून लहानपर्यंत सर्वांमध्ये त्याग, निर्भयता आणि सामर्थ्य आले. त्यामुळे उरमट साम्राज्यशाही, उद्धट अधिकारी वर्ग भारत भूमीतील जागा झालेल्या चैतन्यामुळे हादरले. राष्ट्र शक्ती सामान्य जणांमध्ये आहे फक्त सामान्य जनता सुसंघटित झाली पाहिजे हे तत्व टिळकांनी पुढील नेतृत्वात पुढील आदर्श म्हणून ठेवले; नंतरचे नेते त्यांचे ऋणी राहिले हे पुढील काळवर ध्यान दिल्यास लक्षात येते.

'राष्ट्रीय सभा' ही राष्ट्रीय असली पाहिजे ; म्हणजे ती कोणत्याही एका पक्षाची, विचाराची, जाती-जमातीची होऊ शकत नाही. तिच्यात सर्वांना ज्यांना स्वराज्य हे ध्येय मान्य आहे अशा सर्वांना स्थान असले पाहिजे, तर ती 'राष्ट्रीय' होणार ना? असे लोकमान्यांनी स्पष्टपणे म्हटले. राष्ट्रधर्माने प्रेरित झालेल्या विविध विचारांच्या लोकांची संघटनाच त्यांना अभिप्रेत होती, जी काँग्रेसच्या रूपाने अस्तित्वात आली होती. इंग्रजांचे राज्य ही आपत्ती आहे व ती आपत्ती दूर केली पाहिजे, म्हणजे स्वराज्य हवे असे सांगून ह्या राष्ट्रधर्माच्या प्रणेत्याने म्हटले की हा कार्यभाग साधण्यासाठी हिंदूंना सर्व अधिकार द्या किंवा मुसलमानांना द्या. कायदेमंडळात सगळे ब्राह्मणेतर आले तरी चालतील; हरकत नाही. शेवटी हे प्रश्न आमचे आपापसातील आहेत. त्यामुळे टिळकांनी हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती या सर्वांना राष्ट्रीयत्वात सामावून घेतले. त्या राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे साधन म्हणून 'राष्ट्रीय सभा' जोपासायला हवी, ती अधिकाधिक कार्यक्षम बनवायला हवी असे सांगून त्यागाने आणि मोठ्या निष्ठेने त्यांनी प्रयत्न करून ती वाढविली. त्याचाच परिपाक पुढे लखनौ करारात झाला, संघटनेला तडा जाऊ दिला नाही.

### राष्ट्रधर्माचे मूलभूत अंग-शिक्षण

लो. टिळक तरुणपणीच 'न्यू इंलिश स्कूल' मध्ये शिक्षक म्हणून गेले व जीवनकार्याच्या सुरुवातीला नवी पिढी घडविण्याला आरंभ मेला. जोडीला ध्येयवादी मित्रही होते. आपल्या देशाची निकृष्ट झालेली स्थिती हा वाईट शिक्षणाचा परिणाम मानून त्यांनी देशहिताच्या, राष्ट्रबांधणीच्या दृष्टीने इंग्रजी शासनाद्वारे चालू असलेल्या शिक्षणपध्दतीवर टीका केली. पुढे राष्ट्रीय शिक्षण ही संकल्पना विकसित झाली. त्यामागे टिळकांचा राष्ट्रीय दृष्टीकोन होता. आपल्या परतंत्र राष्ट्राच्या जागृतीसाठी, निर्मितीसाठी, सांस्कृतिक प्रबोधनासाठी त्यांनी उत्तम शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादली. ब्रिटिश सरकारच्या शिक्षणपद्धतीमुळे लोकांमध्ये स्वत्व राहिले नाही, गुलामी प्रवृत्ती वाढली, लोक ध्येयशून्य झाले. कारकुनी करण्यात आनंद मानू लागले. एका ठिकाणी ते म्हणतात,'परके राज्यकर्ते आपल्याला शिक्षण काही मोक्षप्राप्तीकरिता देत नाहीत. निव्वळ पोट भरण्याची त्याचा संबंध असतो.' त्या शिक्षण पद्धतीवर टीका करताना टिळक म्हणतात,' यात देशी भाषांची अवहेलना होते, नीती व धर्म शिक्षण दिले जात नाही, उद्योगधंद्याचे शिक्षण नाही. राष्ट्रप्रेम निर्माण होत नाही' यामुळे अशा निकृष्ट पद्धतीच्या शिक्षणाची अनुपयुक्तता व्यक्त करून, 'देशाभिमान वाढविणारे राष्ट्रीय शिक्षण व राष्ट्रीय शील व नीतिमत्ता निर्माण करणारे धर्मशिक्षण, लोकांना उदरनिर्वाहासाठी, औद्योगिक विकासासाठी तयार करणारे, धंदे शिक्षण, विद्वत्तेची व संशोधनाची दिशा दाखवणारे शिक्षण हवे' असे त्यांनी सांगितले. लो. टिळकांनी शिक्षणाबाबत सरकारवर केलेली टीका अतिशय स्पष्ट, कडक, मुद्देसूद आणि स्वाभिमानपूर्ण अशीच आहे. सरकारच्या शिक्षण पद्धतीतील दोष दाखवून सरकारने मुद्दाम, सहेतुकपणे ते दोष ठेवले आहेत; त्यामुळे उदात्त विचार, उच्च आकांक्षा आणि उत्कट देशाभिमानी याचाच हिंदुस्थानात लोप होत चालला आहे. असे वाटून या राष्ट्रधर्माच्या प्रणेत्याला भ्याडपणा स्वीकारून 'चतकोर भाकरीची गुलामगिरी' करण्यात आमचे लोक आनंद मानून घेत आहेत याचे अतोनात दु:ख होई. त्यांनी आपल्या परीने राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार करून आपल्या सत्वांची, आपल्या पराक्रमाची व आपल्या तेजस्वीतेची जाणीव लोकांना करून दिली. हे त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे असेच म्हणावे लागेल.

### निष्कर्ष

प्रस्तुत शोधनिबंध लोकमान्य टिळकांचे राष्ट्रसभा व शिक्षण विषयक विचार यांची मांडणी करताना शोधकर्त्यांनी खालील निष्कर्ष मांडले आहेत ते पुढील प्रमाणे

१) एक राष्ट्रसभा किंवा राष्ट्रीय काँग्रेस या भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील संघटनेची स्थापना 1885 मध्ये झाली.

२) लोकमान्य टिळकांनी काँग्रेस सारख्या राष्ट्र सभेची शक्ती किंवा सामर्थ्य वाढविण्यासाठी सतत प्रयत्न केले.

३) राष्ट्रसभा ही ब्रिटिश भारताला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी जहाल मार्गाचे समर्थन केले.

४) भारताच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी लोकमान्य टिळकांना विधायक मार्ग मान्य नव्हता तर स्वातंत्र्यासाठी त्यांना आक्रमक मार्ग जवळचा वाटला.

५) राष्ट्रसभा कोणत्याही एका विचाराची संघटना नाही असे टिळकांची भूमिका होती लोकमान्य टिळकांनी राष्ट्रधर्मावर आधारित राष्ट्रीय शिक्षणाचे समर्थन केले होते.

६) राष्ट्रीय शिक्षणासाठी सांस्कृतिक प्रबोधन महत्वाचे आहे असे प्रतिपादन टिळकांनी केले होते.

७) ब्रिटिश शिक्षण पद्धतीवर त्यांनी टीका केली.

८) राष्ट्रीय शिक्षण राष्ट्रीय शील व नीतिमत्ता नियोजन करणारे धर्मशिक्षण लोकांना रोजगार उद्योग व्यापार संशोधनासाठी दिले जावे असे विचार त्यांनी मांडले.

**संदर्भ**

१) भारत सरकार लोकमान्य टिळक ०३/०८/२०२०

२) Lokmanya Tilak – A Biography Gayatri Pagdi Harper India-2019